# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केंस क्र.०८/२०१८-१९/ 167 दिनांक : 20/07/20018

**आदेश केस क्र.०८(२०१८-१९)(११.०७.२०१८)**

| | |
|---|---|
| सौ.माधवी मारुती ठाणेकर<br>१८४९ ए वॉर्ड रंकाळा वेश<br>कोल्हापूर | **अर्जदार** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग कोल्हापूर<br><br>३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पश्चिम उपविभाग ,कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |

**कोरम:-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३.श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## संक्षिप्त पार्श्वभूमी

१) उपरोक्त तक्रारदार सौ. माधवी मारुती ठाणेकर यांचा १८४९ ए वॉर्ड, रंकाळा वेश, कोल्हापूर येथे दवाखाना आहे. त्याचे नाव श्री हास्पिटल आहे, त्यांचा विज ग्राहक क्र. २६६५११७८६३५५/५ आहे. त्यांच्या हॉस्पिटलला ऑक्टोंबर २०१७ पर्यन्त व्यापारी दराने विज आकारणी होत होती. MERC च्या टेरिफ ऑर्डर नुसार हॉस्पिटल कनेक्शन हे Public Services हया वर्गवारीत विज आकारणी करीत विचारात घ्यावे असे आदेश पारीत झालेत. तथापी ऑक्टोंबर २०१७ पर्यन्त त्यांना व्यापारी दरानेच विज आकारणी करण्यात आली. तक्रारदाराने माहे ऑक्टोंबर २०१७ ला वर्गवारी बदलून मिळण्याकरिता व दर आकारणीतील जून २०१२ ते ऑक्टोंबर २०१७ हया कालावधीतील आकारणीतील फरक व तेथून पुढे Public Services हया दर आकारणी नुसार पुढील दर आकारणी करण्याकरिता अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज अंशतः मंजूर करुन नोव्हेंबर २०१७ पासून Public Services हया दराने विज दर आकारणी करण्यांत येवू लागली, तथापी अर्जदारांची मागील कालावधीतील फरकाची मागणी नाकारण्यात आली. सबब तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर मंडल कोल्हापूर कडे तक्रार दाखल केली असता कक्षाने ती तक्रार दिनांक २८.०२.२०१८ चे आदेशाने वीज पुरवठयासाठीच्या वापरासाठी वर्गवारीत बदल , अर्ज प्राप्त झाल्यापासून , दुसरे देयक चक्र संपण्यापूर्वी वर्गवारी बदल करुन घ्यावा, असा आदेश पारीत तथापि अर्ज देण्याच्या पूर्वीच्या कालावधीचा फरक देता येत नसल्याचे अनुमान काढले. त्यामुळे मागील फरकाची मागणी , कक्षाने मंजूर केलेली नाही. सबब तक्रारदाराने ही तक्रार हया मंचासमोर दाखल केलेली आहे.

मंचाने तक्रारदाराना दिनांक २४.०५.२०१८रोजी उपस्थित राहून आपली मागणी मंचाने का स्विकारावी हयाचा खुलासा करणेबाबत कळविले व त्यानुसार दिनांक २४.०५.२०१८ रोजी त्यांनी उपस्थित राहून त्याबद्दल त्यांचे मत लेखी दिले व त्यानुसार मंचाने प्रकरण दिनांक २४.०५.२०१८ रोजी दाखल करुन घेतले.

२) तक्रारदार हयांचे तर्फे त्यांचे पती श्री मारुती मा. ठाणेकर, हयांनी दिनांक २४.०५.२०१८ रोजी हजर होऊन जून २०१२ ते ऑक्टोंबर २०१७ कालावधीत ऐवजी ऑक्टोंबर २०१७ पासून दोन वर्षे आधी पर्यन्तच दिलेल्या बिलातील दराच्या फरकाची सुधारीत मागणी केली आहे व तसे लेखी प्रतिपादन हया मंचासमोर दाखल केलेले आहे

## वि.प. यांची भूमिका

३) वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री पाटील पश्चिम उपविभाग, कोल्हापूर यांनी संबंधित ग्राहकाचा वर्गवारीतील बदला विषयीचा अर्ज माहे ऑक्टोंबर २०१७ ला प्राप्त झालेनंतर त्यांची" म.वि.नि. आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधीत आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ , ४.१३ ब नुसार विज दराच्या अनुसूचीच्या संदर्भात वीज पुरवठा वापरासाठी वर्गवारीत बदल अर्ज प्राप्त झाल्यानंतर दुसरे देयक चक्र संपण्यापूर्वी वर्गवारी बदल करुन देणेत यावा."हया नियमानुसार माहे नोव्हेंबर २०१७ च्या देयकापासून वर्गवारीत बदल करुन देण्यात आला आहे. आणि हयांना मागील माहे जून २०१२ ते ऑक्टोंबर २०१७ मधील देयकातील वर्गवारी दराच्या फरकाची रक्कम देता येत नसल्याबाबत तक्रारदारास कळविले, असे मत मांडले.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदार यांचे गा-हाणे वि.प. यांची भुमिका उपलब्ध केलेली कागदपत्रे विचारात घेता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात

१) मा.विद्युत नियामक आयोगाने जाहिर केलेल्या Public Services या नविन टेरिफ कॅटेगरीनुसार ऑगस्ट २०१२ ते ऑक्टोंबर-२०१७ या कालावधीमध्ये तक्रारदार यांचेकडून अतिरिक्त वसूल केलेली रक्कम (फरकाची रक्कम) परत मागणेस तक्रारदार हे पात्र होते काय?

उत्तरः- नाही

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

४) तक्रारदार हयांचे हॉस्पिटलचे कनेक्शन असून त्यांची विद्युत बिले ही ऑक्टोंबर२०१७ पर्यन्त व्यावसाईक दराप्रमाणे आणि नोव्हेंबर २०१७ पासून Public Services च्या प्रमाणे वर्गवारी चालू आहे. सदरची नविन Public Services ही वर्गवारी मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणे दिनांक ०१.०८.२०१२ पासून लागू झाली याबाबत वाद नाही. हया आदेशाचे आधारे ग्राहकाचा वर्गवारी बदला विषयीचा ५ ऑक्टोंबर २०१७ मध्ये अर्ज प्राप्त झालेनंतर त्यांची next Billing Cycle म्हणजे नोव्हेंबर २०१७ पासून त्यांना नविन दराने Public Services मध्ये विज बिले देण्यात आली. तक्रारदार यांनी आपल्या विज पुरवठयाचे टेरिफ Public Services नुसार लागू करुन जून २०१२ पासून फरक मिळावा असा दिनांक ०५.१०.२०१७ रोजी प्रथमच अर्ज दाखल केला. त्या अर्जावर अतिरिक्त कार्यकारी अभियंता पश्चिम उपविभाग यांनी विद्युत नियामक आयोगाचे विनियम २०१४ मधील , कलम ४.१३ ब अनुसार त्यांची वर्गवारी माहे नोव्हेंबर २०१७ च्या बिलापासून Commercial बदलून Public Services अशी केली . म.वि.नि. आयोग (वितरण परवाना धारकाची कृतीची मानके, वि.पु. सुरु करावयाचा कालावधी आणि भ.चे. नि.) विनियम २०१४, कलम ४.१३ नुसार तक्रारदार यांचा अर्ज वि.प. ला प्राप्त झाला. त्याप्रमाणे लगेचच दुस-या Billing cycle ला त्यांची वर्गवारी बदलवून देण्यात आली .

सदरचे विनियम व त्यातील प्रावधान तक्रारदाराला माहित नव्हते असे तक्रारदाराला म्हणता येत नाही. कायद्याची माहिती नाही असे कोणत्याही नागरिकाला म्हणता येत नाही. किंबहूना पारीत झालले सर्व कायदे, नियम हे हया देशातील नागरिकांना माहित असतात असे कायद्याचे गृहीतक आहे(Presumption of law) त्याच कलम ४.१३ मध्ये विज बिलातील दर आकारणीच्या मागील फरकाबाबत कोणतेही प्रावधान सदर नियमात नाही. कायंद्याच्या कोणत्या सुत्रानुसार तक्रारदार दर आकारणीतील फरकाची मागील मागणी करतो हें तक्रारदारातर्फे स्पष्ट करण्यात आलेले नाही. वर नमूद केलेल्या कलमामध्ये किंवा विनियमांमध्ये मागील थकबाकीचे कोणतेही प्रावधान नाही. हया प्रकरणी तक्रारदारांचा वर्गवारी बदलाचा अर्ज ऑक्टोंबर २०१७ ला वि.प.स. प्राप्त झाला व लगेचच दुस-या Billing cycle ला तक्रारदाराला वर्गवारी बदलून देण्यात आली ही बाब निर्विवाद आहे.

जर तक्रारदार यांनी २०१२ मध्ये वि.प.कडे अर्ज केला असता तर त्यांना वर्गवारी नियमाप्रमाणे बदलून देण्यात आली असती. तक्रारदार यांनी मा. आयोगाचे केस क्र. १९ मधील दिनांक १६ ऑगस्ट २०१२ चे टेरिफ बदलाचे आदेशानुसार प्रथम ऑक्टोंबर २०१७ मध्ये वि.प.कडे अर्ज Tarrif बदलाबाबत अर्ज केला. वादविषयास कारवाईचे कारण, जर तक्रारदाराचा वर्गवारीबदलाचा अर्ज प्राप्त होऊन देखिल Tarrif order प्रमाणे वर्गवारी बदलून दिली नसती किंवा विनियम ४.१३ नुसार दुसरे देयक चक्र संपण्यापूर्वी असा बदल करुन दिला नसता तर cause of action निर्माण झाले असते. MERC च्या Tarrif order मध्ये कुठेही वर्गवारीतील बदलाचा लाभ त्या आदेशानुसार सरसकट सर्वच पात्र ग्राहकांना अर्ज न घेता द्यावा असे आयोगाने आपल्या Tarrif order मध्ये म्हटल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वर नमूद केलेल्या विनियम ४.१३ चे प्रावधान दुर्लक्षित करुन चालत नाही आणि ज्यावेळेला सदर विनियमामध्ये मागील थकबाकी बाबत कोणतेही प्रावधान नाही, त्या अर्थी तक्रारदाराला वर्गवारी बदलाच्या मागील फरकाची रक्कम मागण्यात कोणताही कायदेशीर हक्क निर्माण होत नाही.त्यामुळे तक्रारदार यांची फरकाची रक्कम मिळणेची मागणी कायद्याने मंजूर करता येत नाही.सबब आम्ही मुद्या क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

म्हणून खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार नामंजूर करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण